महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

☑ वर्ष १८ वे : अंक १ ☑ जून २०२३

## हितगूज



महावितरणचा १८ वा वर्धापन दिन आपण नुकताच मोठ्या उत्साहाने साजरा केला. अशा उत्साहाच्या माध्यमातून आपल्यात नवीन उत्साह, चैतन्य निर्माण होत असून याचा आपल्या दररोजच्या कार्यातही चांगला परिणाम होत असतो. आपण दिवसरात्र, चोवीस तास ग्राहकसेवेत व्यस्त असतो. त्यामुळे स्वाभाविकपणे आपल्यामध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा पध्दतीचे उत्साहाचे कार्यक्रम होणे देखील गरजेचे आहे. निरंतर सेवेच्या अठरा वर्षामुळे आपल्या कामाच्या प्रती जबाबदेयता व प्रगल्भता आपल्यामध्ये निश्चितपणे निर्माण झाली असून त्याची जाणीव आपल्या दररोजच्या कामातून दिसून येत आहे.

जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था व स्पर्धा यामुळे सेवाक्षेत्राची व्याप्ती झपाट्याने वाढली आहे. या स्पर्धेच्या जगात ग्राहक हा केंद्रस्थानी आलेला आहे. अशा या ग्राहकांना आपल्यासोबत जोडून ठेवण्यासाठी महत्वाचे माध्यम म्हणजे त्याला आपल्याकडून मिळणारी सेवा. आपल्याकडे येणाऱ्या ग्राहकांची गरज ओळखून त्याची जलद व कमीतकमी वेळेत पूर्तता करणे हे सेवाक्षेत्राचे वैशिष्ट मानले जाते. प्रत्येक क्षेत्रात प्रगती साध्य करण्यासाठी वीज ही मुलभूत गरज आहे. अशी ही महत्वाची गरज भागविण्यासाठी ग्राहकास फारवेळ त्रास सोसावा लागू नये. यादृष्टीने शासन देखील संवदेनशील असून राज्य शासनासारखीच महावितरण आपल्या दारी ही मोहीम आणखी नव्या पध्दतीने राबविणे आवश्यक आहे. ग्राहकांसोबत संवाद साधला पाहिजे. वीज कायद्यातील बदलांमुळे आता ग्राहकाला कुठून व कधीही वीजपुरवठा घेण्याची मुभा मिळाली आहे. ग्राहक संख्येच्याच नव्हेतर ग्राहकांची विक्रमी विजेची मागणी पूर्ण करणे, माहिती व तंत्रज्ञान विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अशा सर्व द्रष्टीने आज आपण देशात अग्रस्थानी आहोत. त्यामुळे अधिक दक्षता बाळगून आपल्याला आपल्या महावितरणचा कार्यभार अधिक चोखपणे पार पाडणे अतिशय आवश्यक आहे.

क्षेत्रीय स्तरावरील मुख्य अभियंता यांची आढावा बैठक नुकतीच घेण्यात आली. या बैठकीच्या माध्यमातून आपणा सर्वांसोबत संवाद साधता आला. माझ्यासाठी ग्राहक हा अतिशय महत्वाचा असून त्या ग्राहकाची कोणत्याही स्वरूपाची तक्रार जास्त दिवस प्रलंबित राहू नये यावरच माझा भर राहणार आहे. साधारणपणे वीजपुरवठा खंडित होणे, उपरी वाहिनीवर बिघाड होणे, केबल फॉल्ट, तारांमध्ये घर्षण, जास्तीचे वीजबिल किंवा सरासरी वीजबिल, मिटर रिडींगमधील सुधारणा, वीजबिल न मिळणे, नावात बदल, वीजभार बदलणे अशा प्रकारच्या ग्राहकांच्या तक्रारी असतात. ग्राहकांच्या तक्रारी आपल्याकडे आल्या असतील तर कृती मानकानुसार ती तक्रार सोडवण्यासाठी काही दिवसांचा किंवा महिन्याचा कालावधी लागणार असेल तर त्याची वाट न पाहता ती तक्रार प्राधान्याने सोडवून ती संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावी. या मानकांचे क्षेत्रीय स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पालन करणे हे अतिशय आवश्यक आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणाऱ्या प्रणालीमध्ये सुधारणा करून तक्रार निवारणाचा कालावधी हा कमीतकमी असायला पाहिजे. ग्राहकांच्या तक्रारींचे जलदगतीने निवारण करणे हे आपले आद्यकर्तव्य असायला पाहिजे.

सर्व अकृषक ग्राहकांकडे आतापर्यंतची असलेली थकबाकी नऊ हजार ४९ कोटी रूपयांपर्यंत पोहोचली आहे. पुढील तीन महिन्यात थकबाकीची ही रक्कम पूर्णपणे वसूल झाली पाहिजे. चालू महिन्यात आठ हजार २१८ कोटी रूपये वसुलीचे उद्दीष्ट निर्धारित करण्यात आले असून दरमहिन्यात १०० टक्के वसुली झालीच पाहिजे. वीजजोडणीकरिता प्रलंबित असलेल्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच ज्याठिकाणी पायाभूत सुविधांची उपलब्धता आहे अशा भागातील कृषीपंपाच्या अर्जदारांना १५ दिवसामध्ये वीजजोडणी देण्यात येऊन या ग्राहकांना वीजबिलींग प्रणालीमध्ये आणण्यात यावे. पैशाचा भरणा करून प्रलंबित असलेल्या व पायाभूत सुविधेची आवश्यकता असलेल्या ठिकाणी कृती मानंकानुसार निर्धारित कालावधीत वीजजोडणी देण्यात यावी. सदर बाब आपल्या महसुलाशी निगडीत असल्यामुळे यासर्व बाबींचा मुख्य अभियंत्यांनी किमान आठवड्यातून एकदातरी आढावा घेतला पाहिजे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही शेतकऱ्यांसोबतच महावितरणच्या दृष्टीनेही अतिशय महत्वपूर्ण असलेल्या या योजनेच्या निविदेचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया युध्दस्तरावर पूर्ण करण्यात यावी. ही प्रक्रिया त्वरित पूर्ण झाली तर मा. वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करून त्यास तातडीने मंजुरी मिळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष द्यावे. ही मंजुरी लगेच मिळाली तर आपल्याला निविदा प्रकिया राबविण्यासाठी मदत होईल. या योजनेतील मुख्य अडचण म्हणजे जागेची उपलब्धतता असून याकरिता महावितरणने जिल्हाधिकाऱ्यांसाठी लॅण्ड बँक पोर्टल उपलब्ध करून दिलेले आहे. प्रत्येक मुख्य अभियंत्यांनी त्यांच्याकडे किती जागा व्यवहार्यद्दष्ट्या उपलब्ध आहेत आणि त्यातील किती प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले आहेत. तसेच त्यातील किती जागांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी किती जागा ताब्यात आलेल्या आहेत. ज्याठिकाणी शासनाची जागा उपलब्ध होऊच शकत नाही अशा ठिकाणी खाजगी जागांचा शोध घ्यावा. या योजनेतील कामे जलदगतीने पूर्ण झाली तर शेतकऱ्यांना दिवसा व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा तर मिळणारच आहे पण सोबतच क्रॉस सबसिडीचा भार कमी होणार असल्याने उद्योग व व्यावसायिक ग्राहकांना स्पर्धात्मक दराने वीज मिळण्यास मदत होईल, त्यामुळे ही योजना प्रभावीपणे राबविणे हे अनेक दृष्टीने आपल्याच फायद्याची आहे. आता सर्वत्र अपारंपारिक ऊर्जेचा वापर वाढवायचा असून यामुळे वीजदर कमी होणे अपेक्षित आहे. या सर्वांचा फायदा राज्यातील उद्योगांसोबतच शेतकऱ्यांना देखील होईल. गेली अनेक वर्षे महावितरणमधील अधिकारी व कर्मचारी सातत्याने कठोर परिश्रम करीत असून त्यादृष्टीने महावितरणही सध्या चांगले काम करत आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण त्वरित करण्यासोबतच दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व शाश्वत वीजपुरवठा देत वीजहानी कमी करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशिल असणार, असा मला विश्वास आहे.

**श्री लोकेश चंद्र**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# शेतीला दिवसा वीज देण्यासाठी कृषी फिडर सौर ऊर्जेवर करणार प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला




सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला. समवेत प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांचेसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी दिसत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील कृषी फिडर सौर ऊर्जेवर करुन त्या भागातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देणार असल्याची माहिती ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला यांनी दिली. सौर कृषी वाहिनी योजनेला गतिमान करण्यासाठी त्यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात महावितरण, महसूल, वनविभाग, भूमिअभिलेख व संबंधित विभागांची एकत्रित आढावा बैठक घेतली.

या बैठकीला प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला यांचेसह ऊर्जा विभागाचे अवर सचिव श्री. नानासाहेब ढाणे, प्रभारी जिल्हाधिकारी श्री. तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शमा पवार, महावितरणचे मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे, अधीक्षक अभियंता सर्वश्री संतोष सांगळे, श्री. निखील मेश्राम (मुंबई), महापारेषणचे अधीक्षक अभियंता श्री. आर.टी. शेळके, भूमिअभिलेखचे जिल्हा अधीक्षक श्री. त.ल. गिडमणी, वनविभागाचे श्री. बाबा हाके यांचेसह इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

यावेळी बैठकीला संबोधित करताना प्रधान सचिव म्हणाल्या, 'शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी शासनाने 'डिसेंबर २०२५' डेडलाईन ठेवली आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. ग्रामपंचायती स्वंस्फूर्तपणे सहभागी होतील त्यांना शासनाकडून प्रोत्साहन म्हणून प्रतिवर्ष ५ लाख प्रमाणे तीन वर्षात मिळून १५ लाखाचा निधी दिला जाणार आहे. तर ज्या गावात सरकारी जमीनी उपलब्ध नाहीत त्याठिकाणी शेतकऱ्यांच्या पडीक जमीनी ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेतल्या जाणार आहेत. या जमीनीला महावितरणमार्फत प्रति एकर, प्रतिवर्ष ५० हजार रुपये भाडे दिले जाणार असून, त्यामध्ये दरवर्षी ३ टक्के वाढ केली जाईल. या करिता महावितरणने लँड बँक पोर्टल सुरु केले आहे. या पोर्टलवर माफक नोंदणी शुल्क भरुन शेतकरी आपली जमीन महावितरणला भाड्याने देऊ शकतात.'

◆◆◆

# विद्युत सुरक्षा जागरुकतेची दखल



शासनाच्या विद्युत निरीक्षण विभागाचे 'विद्युत सुरक्षा सर्वोच्च प्राथमिकता' हे ब्रीद आहे. त्यानुसार 'सुरक्षित काम, सुरक्षित जीवन' या तत्वाचा अंमल होण्यासाठी निरीक्षण विभाग आपली भूमिका बजावतो. विद्युत सुरक्षेच्या दृष्टीने राबविलेल्या उपाययोजनासाठी सांगली शहर दक्षिण उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रसाद प्रभाकर अवघडे यांचा मिरज विद्युत निरीक्षण विभागाच्यावतीने विद्युत निरीक्षक श्री. सं. शं. राठोड यांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सांगलीचे कार्यकारी अभियंता श्री. आप्पासो खांडेकर उपस्थित होते. श्री.अवघडे यांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांची अंमलबजावणी केल्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात वीज अपघाताची संख्या घटली आहे. मानवी व वित्तहानी टळण्यासाठी श्री. अवघडे व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लक्षात घेऊन हा गौरव करण्यात आला.

◆◆◆

# मुख्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा



संचालक श्री. संजय ताकसांडे वृक्षारोपण करतांना सोबत इतर मान्यवर

महावितरण व महानिर्मिती कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, संचालक (वाणिज्य) श्री. योगेश गडकरी व संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांच्या हस्ते कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला दोन्ही कंपन्यातील वरिष्ठ अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆◆◆

# छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रांचे अनावरण



रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रांचे अनावरण मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते करण्यात आले.

पुणे परिमंडलाच्या रास्तापेठ येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रांचे नुकतेच मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते अनावरण झाले.

महावितरण व महापारेषणमधील सर्व कर्मचारी संघटनांच्या 'छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती'च्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री. अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड, डॉ. सुरेश वानखेडे, सहायक महाव्यवस्थापक श्रीमती ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन) व श्रीमती माधुरी राऊत (वित्त व लेखा), उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. शिरीष काटकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी सर्वश्री डॉ. संजय घोडके, विश्वास भोसले, ईश्वर वाबळे, बाबा शिंदे, भीमाशंकर पोहेकर, वसंत ढवळे, भरत अभंग, विजय गुलदगड, किशोर अहिवळे, राजेश गाढवे, सुरेश जाधव, आनंद शिर्के आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता श्री. भागवत थेटे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

यावेळी विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सिद्धार्थ धिवार यांनी हे दोन्ही तैलचित्र चितारले आहे. यावेळी त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

◆◆◆

# उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महावितरण तत्पर - डॉ. मंगेश गोंदावले



उद्योजकांच्या सत्कार सत्कारप्रसंगी (डावीकडून) सर्वश्री बृजेश कुमार राय, नितीन काबरा, डॉ.मंगेश गोंदावले, डॉ. मुरहरी केळे, जै स्योक आन, रामगोंडपा पाटील.

महावितरणच्या विकासात उद्योजकांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे उद्योजकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महावितरण नेहमीच तत्पर आहे. उद्योजकांचे वीजपुरवठा व इतर सेवांबाबतचे सर्व प्रश्न मार्गी लावले जातील, अशी ग्वाही औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिली.

औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील उच्चदाब ग्राहकांचा सत्कार डॉ. मंगेश गोंदावले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उद्योजकांकडून त्यांनी वीजपुरवठ्याबाबतचे व इतर प्रश्न जाणून घेतले. स्थानिक समस्यांवर तातडीने मार्ग काढण्याचे तर धोरणात्मक विषयांवर महावितरणचे मुख्यालय व शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. औरंगाबाद व जालना जिल्ह्यात वाढत्या विजेची मागणी पाहता येत्या दशकभराचे नियोजन महावितरणने केले आहे. पायाभूत सुविधा बळकटीकरणाचे कामही सुरू आहे. तसेच महापारेषणसोबत चर्चा करून उच्चदाब ग्राहकांचे प्रश्न सोडवू, असे डॉ गोंदावले म्हणाले.

यावेळी जालना येथील भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्सचे संचालक श्री. नितीन काबरा, औरंगाबाद येथील स्टरलाईट टेक्नॉलॉजीचे सहयोगी महाव्यवस्थापक सर्वश्री बृजेश कुमार राय, रामगोंडपा पाटील तसेच ह्योसंग इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक श्री. जै स्योक आन यांचा डॉ. श्री. गोंदावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महावितरणच्या सेवांबद्दल उद्योजकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे, अधीक्षक अभियंते सर्वश्री उत्क्रांत धायगुडे, सतीश खाकसे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील उपस्थित होते.

◆◆◆

# वैष्णवांचे पुणे परिमंडलात स्वागत; अल्पोपहाराची सेवा



नाशिक फाटा येथे महावितरणच्यावतीने मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी वैष्णवांचे स्वागत केले.

जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील दिंडींचे पुणे परिमंडल अंतर्गत नाशिक फाटा येथे आगमन झाले. त्यावेळी महावितरणच्या वतीने पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार तसेच वरिष्ठ अभियंता व कर्मचाऱ्यांनी वैष्णवांचे स्वागत केले.

नाशिक फाटा येथे पालखी सोहळ्यातील वैष्णवांच्या स्वागतासाठी पूर्वतयारी करण्यात आली होती. मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, अधीक्षक अभियंता श्री. संजीव राठोड, कार्यकारी अभियंता श्री. दत्तात्रेय साळी व श्री. उदय भोसले यांच्यासह अभियंता व जनमित्रांनी वैष्णवांचे स्वागत केले. यावेळी महावितरणकडून चिवडा व बुंदीचे २० हजार पाकिटे वितरीत करून वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. यानंतर मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी दिडींत वारकरी म्हणून नाशिक फाटा ते दापोडीपर्यंत सहभाग घेतला.

दरम्यान जगदगुरू संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांचा पुणे परिमंडल अंतर्गत पालखी सोहळा मार्ग व मुक्कामाच्या ठिकाणी सुमारे १५० अभियंता व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. सुरळीत वीजपुरवठ्यासह वीज सुरक्षेसाठी उपाययोजना करीत दिडींतील वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, फळे, अल्पोपाहार आदींची महावितरणकडून सेवा देण्यात आली.

◆◆◆

# महावितरणचा १८ वा वर्धापन दिन सर्वत्र उत्साहात साजरा

## कल्याण परिमंडल :



कल्याण परिमंडलात महावितरणचा १८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे (भाप्रसे), कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर, भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती.

वर्धापन दिनानिमित्त कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण परिमंडल, कल्याण एक आणि दोन तसेच कल्याण स्थापत्य मंडलांतर्गत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या उपस्थितीत जवळपास ५० कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी विविध मराठी-हिंदी गिते, अभिनय आणि कला सादर केल्या. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त कार्यकारी संचालक चंद्रशेखर येरमे, अधीक्षक अभियंते सर्वश्री दीपक पाटील, दिलीप भोळे, विजय मोरे, संदीप पाटील, महेश अंचिनमाने, महाव्यवस्थापक अनिल बऱ्हाटे, उपमहाव्यवस्थापक सुनिल पाठक, योगेश खैरनार, उपसंचालक सुमीत कुमार, सहायक महाव्यवस्थापक धैर्यशील गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, वरिष्ठ व्यवस्थापक विश्वनाथ कट्टा, निलेश भवर, शशिकांत पोफळीकर, कार्यकारी अभियंते, उपविभागीय व शाखा अभियंते, नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कदम, स्मिता पेवेकर व सुशांत कांबळे यांनी केले.

## अमरावती परिमंडल :



मनोगत व्यक्त करतांना मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि इतर

अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करणे हे महावितरणचे ब्रीद आहे. त्यामुळे महावितरणची सेवा अधिक ग्राहकाभिमूख करावी, वीज सेवेची गुणवत्ता व दर्जा वाढवून जनतेच्या मनात महावितरणचे स्थान बळकट करण्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.

अमरावती परिमंडल येथे पार पडलेल्या महावितरण वर्धापनदिनाच्या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता सुनिल शिंदे, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, प्रभारी अधीक्षक अभियंता नरेंद्र कटारे, कार्यकारी अभियंता भारतभूषण औघड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वरिष्ठ यंत्रचालक नाशिक परिमंडल संदिप पाचंगे यांच्या 'चूकीला माफी नाही' या एकपात्री नाट्य प्रयोगाने कार्यक्रमाची सुरूवात करून वीज कर्मचाऱ्यांना जोखीमेच्या या क्षेत्रात सुरक्षा साधनाचा वापर करण्याची साद घालण्यात आली. तर मंगेश ठाकरे यांनी 'नमुने इरसाल' सादर करत कर्मचाऱ्यांना हसविले. वऱ्हाडी आणि विनोदी कवी डॉ. मिर्झा बेग यांच्या कवितेने कर्मचाऱ्यांचे मनोरंजन केले. त्यानंतर कर्मचारी व त्यांच्या पाल्यांच्या सहभागाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहायक अभियंत्या वैशाली ठाकरे, प्रियंका सोळंके, प्रतिभा जीवतोडे, कांचन मडावी, प्रफ्फूल देशमुख यांनी केले.

## अकोला परिमंडल :




मागील १८ वर्षात अनेक सकारात्मक बदल करण्यात आले आहेत. परंतु यापुढील काळात महावितरणला वीज हानी कमी करण्याबरोबर विविध वर्गवारीतील ग्राहकाकडील थकीत असलेल्या वीजबिलाची वसुली करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर यांनी केले.

शुभकर्ता लॉन्स येथे पार पडलेल्या वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता पवनकुमार कछोट, सहाय्यक महाव्यवस्थापक मनिषकुमार भोपळे, उपविधी अधिकारी सुनिल उपाध्ये, ग्राहक तक्रार निवारण मंच प्रभारी प्रमुख वर्षा नेरकर,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विशाल पीपरे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

महावितरणचा मागोवा आणि महावितरण पुढील आव्हाने सांगत अधीक्षक अभियंता पवनकुमार कछोट यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार अभियंता लकडे यांनी मानले.

## लातूर परिमंडल :



कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे आणि इतर

लातूर परिमंडलात वर्धापनदिनानिमित्त हासेगाव सेवालयातील चिमुकल्यांच्या हॅपी म्यूझिक शो ने उपस्थितांची मने जिंकली तर हसत खेळत तणावमुक्तीचे श्री. अशोक देशमुखांच्या हास्यकल्लोळाने सभागृहात रंगत वाढविली. हासेगाव सेवालयातील एचआयव्ही बाधीत चिमुकल्यांनी विविध कला आणि नृत्याविष्काराने अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांची मने जिंकली. प्रेक्षकांनी त्यांच्या कलागुणांचे कौतुक करीत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मदन सांगळे, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. अनिल काळे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. चंद्रकांत खाडे, कार्यकारी अभियंता श्री. बी. जी. शेंडगे, श्री प्रदीप पुनसे, श्री. गणेश सामसे, श्री. संजय पोवार, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. महेंद्र चुनारकर, व्यवस्थापक श्री. संजय खाडे, सेवालयाचे श्री. रवी बापटले यांच्यासह अधिकारी- कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय मोठया संख्येने उपस्थित होते.

## पुणे परिमंडल :



महावितरणच्या वर्धापन दिनाच्या समारोपीय कार्यक्रमात प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे व मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस प्रदान करण्यात आले.

महावितरणच्या वर्धापनदिनानिमित्त पुणे परिमंडलामध्ये कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित विविध कार्यक्रमांचा, स्पर्धांचा नुकताच उत्साहात समारोप झाला. ऐरवी धकाधकीच्या वीजक्षेत्रात अविश्रांत सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांसह त्यांचे कुटुंबिय व बालगोपाळांना विविध कार्यक्रमातून नवी ऊर्जा मिळाली.

वर्धापन दिन समारोप कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून प्रादेशिक संचालक (प्र.) श्री. अंकुश नाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक अभियंते सर्वश्री अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड, डॉ. सुरेश वानखेडे उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रमात प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे व मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस प्रदान करण्यात आले. पथनाट्यातील सर्व महिला कलावतांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेता व खोखोपटू प्रतीक वाईकर, क्रिकेटपटू अजय चव्हाण, धावपटू गुलाबसिंग वसावे, पॉवर लिफ्टर मनीष कोंड्रा, जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन) व माधुरी राऊत (वित्त व लेखा) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांनी केले.

## कोकण परिमंडल :




मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांच्या हस्ते ऊर्जा शिरोमणी पुरस्कार स्वीकारताना चिपळूण विभागाचे कार्यकारी अभियंता कैलास लवेकर

कोकण परिमंडलात गत वर्षातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल वीज कर्मचाऱ्यांना ऊर्जा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. ऊर्जा शिरोमणी पुरस्काराचे मानकरी चिपळूण विभागाचे कार्यकारी अभियंता कैलास लवेकर हे ठरले. यावेळी महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना सातत्यपूर्ण वीजसेवा देण्याचा निर्धार केला आहे.

रत्नागिरीस्थित परिमंडल कार्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. विनोद पाटील, अधीक्षक अभियंता श्री. नितीन पळसुलेदेसाई, अधीक्षक अभियंता (पायाभुत आराखडा प्र.) राजश्री मोरे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. वैभव थोरात, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. आप्पासाहेब पाटील, कार्यकारी अभियंता श्री. विशाल शिवतारे (खेड), श्री. बाळासाहेब मोहिते (कणकवली), श्री. विनोद विपर (कुडाळ), श्री. विनय तिरमारे (रत्नागिरी), श्री. अजित अस्वले (चाचणी विभाग), प्रणाली विश्लेषक श्री. हर्षद आपटे, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा प्र.) लक्ष्मण अन्नल दास यांची प्रमुख उपस्थिती होती. ऊर्जा शिरोमणी, ऊर्जारत्न, ऊर्जाभूषण या तीन श्रेणीत पुरस्कार वितरीत करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता भागवत थेटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संतोष गहेरवार, मृदुला शिवदे, भक्ती जोशी, कैलास कांबळे यांनी केले तर कार्यकारी अभियंता भाऊसाहेब सावंत यांनी आभार मानले. आयोजनासाठी सहायक महाव्यवस्थापक ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन) व माधुरी राऊत (वित्त व लेखा), उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटनी यांच्यासह मंडलनिहाय स्थानिक समित्यांनी पुढाकार घेतला.

## नांदेड परिमंडल :



वर्धापन दिनानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी ऊर्जा तरंग या कौटुंबिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल डोये यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी नांदेड मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. सुधाकर जाधव व पायाभूत आराखडा विभागाचे प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. सुनिल वनमोरे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. सुशिल पावसकर, कार्यकारी अभियंता श्री. श्रीनिवास चटलावार, श्री. सतिश पेंढारकर,श्री. देवेंद्र गिल्लूरकर, श्री. अभिमन्यू राख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. महेंद्र बागूल, लेखा विभागाचे प्रभारी वरिष्ठ व्यवस्थापक श्री. महारूद्र नाईकनवरे, प्रभारी व्यवस्थापक श्री. पंडीत आंबेकर प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. यावेळी दहावी व बारावी परिक्षेत गुणवत्ता प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले.

याप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या प्रबोधनासाठी व मनोरंजनासाठी श्री. अनंत खेळकर यांचा अनंतायन हा कार्यक्रम घेण्यात आला तसेच प्रज्वलित या सुमधूर गीतांच्या ऑर्केस्ट्राचा आनंद उपस्थित कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी घेतला. या सोहळयाचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता श्री. नारायण मार्लेगावकर यांनी केले. तर सुत्रसंचालन श्रीमती सारिका जोशी, श्रीमती किरण देशमूख, श्रीमती कविता कांबळे यांनी केले तर पंडीत आंबेकर यांनी आभार व्यक्त केले.

## जळगाव परिमंडल :



केक कापून आनंद साजरा करताना मुख्य अभियंता श्री. कैलास हुमणे, अधीक्षक अभियंता श्री. अनिल महाजन व इतर

वर्धापन दिन जळगाव परिमंडलात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महावितरणचे अभियंते तसेच कर्मचाऱ्यांनी संगीत रजनी कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

सोहळ्याचे उद्घाटन जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. कैलास हुमणे यांच्या हस्ते झाले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. अनिल महाजन, सहायक महाव्यवस्थापक श्री. नेमीलाल राठोड, कार्यकारी अभियंता सर्वश्री राजेंद्र मार्के, अनिरुद्ध नाईकवाडे, रमेशकुमार पवार, संदीप शेंडगे, प्रदीप घोरुडे, ब्रजेश गुप्ता, धमेंद्र मानकर, विजय पाटील, रामचंद्र चव्हाण, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अरुण शेलकर, प्रणाली विश्लेषक श्री. विलास फुलझेले, वरिष्ठ व्यवस्थापक सर्वश्री देवेंद्र कासार, अमित सोनवणे, व्यवस्थापक श्रीमती तन्वी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यात उज्ज्वल पाटील, विशाल आंधळे, पराग चौधरी, सुरेश पाचंगे, संतोष सोनवणे, अमेय भट, सुरेश गुरचळ, श्रीमती स्वरांगी श्रावगी, युगंधरा राऊत, ज्योती दुसाने, तनिष्का भालेराव यांनी सुमधुर गाणी गायली. श्री. संदीप मराठे यांनी काव्य वाचन केले. श्रीमती मोहिनी पाटील यांनी रांगोळी काढली तसेच नृत्यही केले. श्रीमती गायत्री पाटील, ग्रीष्मा रामकुवर, तनिष्का नाचन यांनी नृत्य सादर केले. श्री. कुर्बान तडवी यांनी काठी फिरवण्याचे कौशल्य दाखवले. श्री. रविंद्र खलसे यांनी बासरीवादन करुन उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याचे सूत्रसंचालन कनिष्ठ अभियंता श्रीमती रत्ना पाटील यांनी केले.

## औरंगाबाद परिमंडल :




औरंगाबाद परिमंडलात पाल्यांच्या हस्ते केक कापून वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

कथाकथन, एकपात्री नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी खेळ अशा भरगच्च कार्यक्रमांनी औरंगाबाद परिमंडलात महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या हस्ते केक कापून आनंद साजरा करण्यात आला. ग्राहकांना अविश्रांत सेवा देणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना या सोहळ्यामुळे नवी ऊर्जा मिळाली.

औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.श्री.मंगेश गोंदावले, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.श्री.मुरहरी केळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा रंगला. यावेळी श्रीमती दीक्षा सोनवणे यांनी विविध खेळ व स्पर्धा घेऊन महिलांचा उत्साह वाढवला. प्रा.श्री.रवींद्र कोकरे यांच्या खुमासदार शैलीतील कथाकथनाने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. श्री. संदीप पाचंगे यांच्या 'चुकीला माफी नाही' या एकपात्री प्रयोगाने विद्युत सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. श्री.दिलीप खंडेराय व संचाने सादर केलेल्या महाराष्ट्राची लोकधारा' या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'ज्युनिअर चार्ली' श्री.सोमनाथ स्वभावणे यांनी बच्चे कंपनीचे मनोरंजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता श्री.अविनाश सानप यांनी केले.

निबंध स्पर्धेतील विजेते सर्वश्री नवनाथ पवार, राजेंद्र राठोड, नितीन सूर्यवंशी (कर्मचारी गट) आणि यज्ञेश चौधरी, कु.कल्याणी चव्हाण, कु.राजेश्री शिंदे (पाल्य गट) यांना गौरवण्यात आले. प्रा.डॉ.श्री.रमेश औताडे यांनी या स्पर्धेचे परिक्षण केले. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय यंत्र अभियांत्रिकी परिषदेसाठी निवड झाल्याबद्दल कर्मचारी श्री. नितीन सूर्यवंशी यांचा मुलगा स्वराज याचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.श्री.गोंदावले यांनी रोख १० हजार रुपये देऊन कौतुक केले.

## नाशिक परिमंडल :



महावितरण वर्धापन दिनानिमित्त केक कापताना मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांच्या समवेत कर्मचाऱ्यांची चिमुकली मुले.

अत्यावश्यक सेवा देणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वर्धापन दिनाच्या माध्यमातून एकत्र येऊन आपसात स्नेहभाव वृद्धिंगत करीत आहोत याचप्रमाणे दैनंदिन जीवनात सुद्धा ग्राहक आणि अंतर्गत महावितरणमधील सर्वांशी विद्युत यंत्रणेप्रमाणे कुटुंबव्याप्ती सुद्धा वाढवावी असे प्रतिपादन नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी केले. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. देवेंद्र सायनेकर व नाशिक मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर उपस्थित होते.

यावेळी सादर करण्यात आलेल्या आर्केस्ट्रामधील कलावंतांनी एकापेक्षा एक सुमधुर गीत गायन करून सर्वांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे यांनी केले तर श्री. सतीश पाटील यांनी आभार मानले.

## भांडुप परिमंडल :




वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करताना अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश खांडेकर यांच्या समवेत उपस्थित अधिकारी.

१८ व्या वर्धापन दिनानिमित्त भांडुप परिमंडलातील विविध मंडळ कार्यालयातर्फे कर्मचारी व त्यांच्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात कोंकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे यांनी स्वतः रक्तदान करून शिबिराला सुरुवात केली व इतरांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. या शिबिरात १०४ जणांनी रक्तदान केले. संभाजीनगरचे प्रसिद्ध शिव शाहीर श्री. प्रवीण जाधव व त्यांच्या चमूनी शिवराज्याभिषेकावर पोवाडा प्रस्तुत केला. दिपेश सावंत लिखित व निर्मित एक अप्रतिम नाटक 'कुणी गोविंद घ्या' सादर करण्यात आले. थोर इतिहासकार, मोडीलिपी अभ्यासक व रायगड येथील राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य श्री पंकज भोसले यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांवर रचिलेले कविराज भूषण यांचे विरसरसातील काव्य सादर करून वातावरण रोमांचित केले व छत्रपतींची महती जनसमुदायापर्यंत पोहचवली. झी टीवी वरील 'सा रे ग म प लिटिल चॅम्प' मधून प्रकाश झोतात आलेली विजेती कु. ज्ञानेश्वरी गाडगे हिची गाण्यांची मैफिल. तिच्या विविध शैलीतील गाण्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. भारत देशातील विविधतेतून पण एकता दर्शविणाऱ्या '' मिले सूर मेरा तुम्हारा '' या गाण्याचे नृत्यरूपी सादरीकरणाने आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सर्वोत्तम ग्राहकसेवा व पूर्ण वसुली महत्वपूर्ण : रंगारी



उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अभियंत्यांचा गौरव करताना श्री. रंगारी व इतर

ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देताना त्यांनी वापरलेल्या वीज बिलाची पूर्ण वसूली करणे महावितरणच्या अस्तित्वासाठी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे अभियंत्यांनी यादृष्टीने आपले कर्तव्य चोखपणे बजावावे असे निर्देश नागपूर प्रादेशिक विभागाचे संचालक श्री. सुहास रंगारी यांनी दिले.

नागपूर व वर्धा जिल्ह्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या विभाग,उपविभागामध्ये आयोजित बैठकीत करतांना ते बोलत होते. महावितरणची सद्यस्थिती व भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन अभियंत्यांनी अधिक प्रभावीपणे काम करण्याची गरज असल्याचे मत नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांनी यावेळी व्यक्त केले. या सत्कार कार्यक्रमाला महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) शरद दाहेदार, अधीक्षक अभियंते सर्वश्री अजय खोब्रागडे, अशोक सावंत, अमित परांजपे, नारायण लोखंडे, सहाय्यक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) अशोक पोइनकर प्रामुख्याने उपस्थित होते.

◆◆◆

## यूपीएससी परीक्षेत स्वनील डोंगरे यांचे यश



स्वनील डोंगरे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांच्या समवेत स्वनील यांचे आई आणि वडील

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) घेतलेल्या वर्ष २०२२-२३ नागरी सेवा परीक्षेत नाशिक येथील स्वनील राजाराम डोंगरे यांनी गुणवत्ता यादीत ७०७ वा क्रमांक पटकाविला आहे. नाशिक ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. राजाराम डोंगरे यांचा तो मुलगा आहे. त्याच्या या यशाबद्दल नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर यांनी त्यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ देत स्वनील आणि परिवाराचे अभिनंदन केले आहे. स्वनील यांनी अभियांत्रिकी मध्ये पदवी घेतली असून मागील काही वर्षांपासून त्याची स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु होती. त्यांच्या या यशाबद्दल महावितरणमध्ये कौतुक व्यक्त झाले असून अनेकांनी अभिनंदन केले आहे.

◆◆◆

## नऊ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा गुणवंत कामगार पुरस्कार

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारासाठी महावितरणच्या तब्बल नऊ कर्मचाऱ्यांची निवड झाली आहे.

आस्थापनेत किमान ५ वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येत असून २५ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह व पदक असे स्वरुप असलेल्या या पुरस्कारासाठी हिंगोली येथील ललितादास भवानीदास देशपांडे, वाशिम येथील प्रशांत जनार्दन भगत, छत्रपती संभाजीनगर येथील रमेश काकासाहेब शिंदे, नागपूर येथील मधुकर मोतीराम सुरवाडे आणि मोहनदास जानरावजी चोरे, अमरावती येथील प्रेमानंद महादेवराव गडपायले, नाशिक येथील विलास राजाराम वडघुले, सांगली जिल्ह्यातील शिराळा येथील राजेंद्र सुभाष माने आणि जळगाव येथील दिगंबर साहेबराव भदाणे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. मंडळातर्फे दरवर्षी ५१ कामगारांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते त्यापैकी यावर्षी महावितरणच्या तब्बल नऊ कर्मचाऱ्यांचा समावेश असून पुरस्कार प्राप्त सर्व कर्मचाऱ्यांचे महावितरणतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

◆◆◆

## पुणे, पिंपरी शहरा लगत आणखी इव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारणार - श्री. प्रसाद रेशमे




गणेशखिंड उपविभाग कार्यालयातील अत्याधुनिक इव्ही चार्जिंग स्टेशनच्या उद्घाटनप्रसंगी संचालक श्री. प्रसाद रेशमे, प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे व मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार.

दिवसेंदिवस इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीत मोठी वाढ होत असून महावितरणने देखील इलेक्ट्रिक वाहनांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या चार्जिंग स्टेशन्सच्या उभारणीला वेग दिला आहे. पुणे परिमंडल अंतर्गत सद्यस्थितीत १५ चार्जिंग स्टेशन्स कार्यान्वित झाले आहेत. यापुढे पुणे व पिंपरी चिंचवड शहर व लगतच्या राष्ट्रीय महामार्गावर आणखी चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात येतील अशी माहिती संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी नुकतीच दिली.

पुणे येथील सेनापती बापट रस्त्यावरील गणेशखिंड उपविभाग कार्यालयाच्या परिसरात नव्याने उभारलेल्या इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनचे उद्घाटन संचालक श्री. रेशमे यांच्याहस्ते नुकतेच झाले. यावेळी पुणे प्रादेशिक संचालक (प्र.) श्री. अंकुश नाळे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुणे परिमंडलामध्ये सद्यस्थितीत १५ उपकेंद्राच्या ठिकाणी महावितरणकडून इव्ही चार्जिंग स्टेशन्स कार्यान्वित करण्यात आले आहेत. कार्यक्रमाला अधीक्षक अभियंते सर्वश्री शंकर तायडे, सतीश राजदीप, युवराज जरग, अरविंद बुलबुले, प्रवीण पंचमुख, डॉ. सुरेश वानखेडे आदींसह अभियंता, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

◆◆◆

# ग्राहक सेवेच्या गुणवत्तेत सातत्य राखा : श्री लोकेश चंद्र
## १८ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न



कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून शुभारंभ करताना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक व इतर मान्यवर.

ऊर्जा ही सर्व प्रगती साध्य करण्याची मुलभूत गरज आहे. सर्व क्षेत्रांच्या प्रगतीकरिता आवश्यक तेवढी ऊर्जा उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यादृष्टीने महावितरण सध्या चांगले काम करत आहे. गेली अनेक वर्षे महावितरणमधील अधिकारी व कर्मचारी सातत्याने कठोर परिश्रम करत आहेत. ते ग्राहकांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व शाश्वत वीजपुरवठा देत वीजहानी कमी करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

महावितरणच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. याप्रसंगी पुढे बोलताना ते म्हणाले की, आरडीएसएस योजनेच्या माध्यमातून स्मार्ट मीटर, स्काडा असे प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबवायचे आहेत. यापुढेही आपण ग्राहक सेवेच्या गुणवत्तेत सातत्य राखाल. येणाऱ्या काळात महावितरणची आणि पर्यायाने राज्याची प्रगती अधिक जोमाने होईल असे प्रतिपादन श्री. लोकेश चंद्र यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, दैनिक महाराष्ट्र टाईम्सचे मुख्य संपादक श्री. पराग करंदीकर, महावितरणचे संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, संचालक (वाणिज्य) श्री. योगेश गडकरी व संचालक (मानव संसाधन) श्री अरविंद भादिकर उपस्थित होते.

श्री. लोकेश चंद्र पुढे म्हणाले, 'केंद्राच्या मदतीने राज्यात आरडीएसएस योजना राबवण्यात येत आहे. ही योजना यशस्वी होण्याकरिता चांगल्याप्रकारे कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० यामुळे शेतकऱ्यांना दिवसा व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा होईल. क्रॉस सबसिडीचा भार कमी होणार असल्याने उद्योग व व्यावसायिक ग्राहकांना स्पर्धात्मक दराने वीज मिळण्यास मदत होईल. तसेच अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवायचा असून यामुळे वीजदर कमी होणे अपेक्षित आहे. या सर्वाचा फायदा राज्यातील उद्योगांना होईल.

मराविमं सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक म्हणाले, 'राज्यात औद्योगिक व आर्थिक प्रगती साधायची असेल तर वीज ही अत्यावश्यक घटक आहे. त्याकरिता विजेचे नियोजन आवश्यक आहे. ना. श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना वीज यंत्रणेचे सक्षमीकरण झाले होते. त्यामुळे महाराष्ट्राची इकॉनॉमी वन ट्रिलीयनवर नेण्यास महाराष्ट्र तयार आहे.

महावितरणसमोरील आव्हाने या विषयावर बोलताना दैनिक महाराष्ट्र टाईम्सचे मुख्य संपादक श्री पराग करंदीकर म्हणाले, 'मंडळापासून कंपनी झाल्यानंतर महावितरणची परिस्थिती चांगली झाली आहे. मात्र अद्याप काही सुधारणा करणे अपेक्षित आहे. ग्राहकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडवणे गरजेचे आहे. आज ग्राहक आपल्या हक्कांबद्दल जागरूक आहेत त्यामुळे महावितरणला अधिक ग्राहकाभिमुख व्हावे लागेल. आर्टीफिशियाल इंटीलीजन्सचे दिवस आले असून यातही आपले अस्तित्व टिकवून ठेवले पाहिजे. याकरिता कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. वीज क्षेत्र हे सर्व प्रगतीचा कणा आहे. तो सक्षम असणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमास महावितरणमधील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती प्रणाली निमजे यांनी केले तर आभार कंपनी सचिव श्रीमती अंजली गुडेकर यांनी मानले. वर्धापन दिनानिमित्त प्रकाशगड येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता दुपारच्या सत्रात 'मनाची अमर्याद शक्ती' या विषयावर डॉ.दत्ता कोहिनकर यांनी कार्यशाळा घेतली. तर सायंकाळी स्वरस्पर्श हा मराठी गीतांचा कार्यक्रम झाला.

◆◆◆

## महावितरणची समाज माध्यमे आता अधिक लोकाभिमुख

महावितरणचे ट्वीटर, फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्यूब यांसारख्या समाजमाध्यमांना सहजपणे लाईक, शेअर आणि सबस्क्राईब करण्यासाठी या चारही समाजमाध्यमांचे क्युआर कोडस तयार करण्यात आली आहेत. आपणास या समाजमाध्यमांना भेट देण्यासाठी आपल्या मोबाईलव्दारे हे क्युआर कोडस स्कॅन करुन केवळ ओपन लिंकवर क्लिक करायचे आहे, क्लिक करताच संबंधित पेज ओपन होईल.

MSEDCL's Twitter Account @msedcl
MSEDCL's Facebook Account @msedcl
MSEDCL's Instagram Account @msedclofficial
MSEDCL's YouTube account @mahavitaranofficial

◆◆◆




उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पुणे परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत यांचा महावितरणच्या वर्धापन दिनी पुणे येथील कार्यक्रमात प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे व पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**Printed & Published by Shri. Anil M. Kamble** of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& **Published at** Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
***The Company accepts no responsibility for the matter published in the journal.***

संपादक: अनिल मु. कांबळे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)